# रा.भा.शिर्के प्रशाला,रत्नागिरी
# वार्षिक अहवाल २०१२-१३

**१. इयत्ता १० वी March २०१२ Result २७७- २६५- ९५.६६%**

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा विभाग**

सन २०११-१२ या सालाकरिता शिष्यवृत्ती परीक्षेला (इ.७ वी ) एकूण ८९ विद्यार्थी बसले होते. उत्तार्ण विद्यार्थी ८९ व **निकाल १००%** लागला. **१४** विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

**एम.टी.एस.परीक्षा ( इ.६वी)**

सन २०१२ सालाकरिता एम.टी.एस.परीक्षेकरिता एकूण ७० विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. **निकाल १००%**लागला. **एकूण ५ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले.**

**महाराष्ट्र ज्ञानपीठ ( गणित )**

**इ. ५ वी प्रविष्ठ - ३६ निकाल - १००%**
**इ. ६ वी प्रविष्ठ - ८० निकाल - ८९.३३%**
**इ. ७ वी प्रविष्ठ - ४८ निकाल - १००%**

**इंग्रजी विभाग**

सन २०११-१२ साठी इ.५वी ते ७ वी साठी हस्ताक्षर व वाचन स्पर्धा आयोजीत करण्यात आली तर इ.८ वी व ९ वी साठी भाषण स्पर्धा व कथा कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले इ.५ वी ते १० वी साठी घेण्यात येणा-या शालाबाहय परीक्षांना विद्यार्थ्याचा उत्तम प्रतिसाद मिळतो.इंटरनॅशनल सायन्स ऑलिंपीयाड असोशिएशन(ISOA)तर्फे आयोजीत **इंग्लीश ऑलिंपीयाड स्पर्धेचा २०१०-११** चा शै.वर्षाचा **निकाल १००%**असून वर्ष २०११-१२ साठी ५ वी ते ७ वी अखेर एकूण ५७ विद्यार्थी प्रविष्ठ होत आहेत.इ.१० वी च्या विद्यार्थ्यानसाठी बोर्ड परीक्षेत अधिकाधीक गुण प्राप्त करणे सुलभ व्हावे यासाठी अतीरीक्त पुरक मार्गदर्शन प्रशालेमार्फत उपलब्ध केले जाते.

**हिंदी विभाग**

**महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे २०१२**

**राष्ट्रभाषा हिंदी बालबोधिनी,प्राथमिक व सुबोध परीक्षा - निकाल १००%**

**संस्कृत विभाग अहवाल**

सन २०११-१२ शालान्त परीक्षेत संस्कृत संपूर्ण या विषयाचा **निकाल १००%** लागला . संयुक्त संस्कृत या विषयाचा **निकाल ९९%** लागला.दरवर्षीप्रमाणे प्रशालेत संस्कृत दिन मोठया उत्साहात साजरा केला गेला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या प्रशालेच्या माजी संस्कृत शिक्षिका सौ.वंदना घैसास यांना निमंत्रित केले होते. संस्कृत दिनाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी संस्कृत नाटिका, गणेशस्तोत्र, गीत, नृत्य इ. कार्यक्रम सादर केले.

या कार्यक्रमाचे आयोजन,सूत्रसंचालन विदयार्थ्यांनीच केले. या कार्यक्रमासाठी सौ.स्नेहा दुदगीकर आणि सौ.संध्या सप्रे यांनी मोलाचे सहकार्य केले. संस्कृत विभागाम.तर्फे संस्कृत हस्ताक्षर व शुध्दलेखन स्पर्धा घेण्यांत आल्या.

सन २०११-१२ प्रशालेतील संस्कृत विभागातर्फे फेब्रुवारी २०१२ मध्ये **महाराष्ट्र ज्ञानपीठ संस्कृत बाहयपरीक्षा** घेण्यांत आल्या . या परीक्षेला एकूण ५४ विद्यार्थी बसले होते. परीक्षेचा **निकाल १००%** लागला.

**कोकण प्रज्ञा शोध परीक्षा**

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ साठी डिसेंबर २०१२ मध्ये घेण्यात येणा-या के.टी.एस(कोकण प्रज्ञा शोध परीक्षा) परीक्षेसाठी इ.८ वी ९ वी तील एकूण १०९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.सदर परीक्षेसाठी इ. ८ वी मधून १६ व ९ वी मधून ५ मागास प्रवर्गातील विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. र.ए.सोसायटी तर्फे आयोजित केल्या जाणा-या के.टी.एस.परीक्षेसाठी दि.०२/०९/२०१२ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेसाठी गो.जो.महाविद्यालय व अंभ्यकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय रत्नागिरी येथील प्राध्यापक सौ.एस.एस.सुर्वे,सौ.वारगावकर,सौ.पटवर्धन, सौ.जोशी यानी दोन सत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना परीक्षेचा अभ्यास अधिक प्रभावीपणे करण्यासाठी आणि परीक्षातंत्र अधिक उत्तम पध्दतीने आकलन होण्यासाठी मार्गदर्शकांनी आवश्यक घटकांचा खुलासा करुन विद्यार्थ्यांना प्रभावी मार्गदर्शन केले

**गणित बाहयपरीक्षा**

रत्नागिरी जिल्हा गणित अध्यापक मंडळामार्फत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यासाठी गणित संबोध परीक्षा घेण्यांत आली होती. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्याचा समावेश करण्यांत आला होता.

**गणित संबोध परीक्षा** - प्रविष्ठ विद्यार्थी- ५२ प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी - २०

**गणित प्राविण्य परीक्षा** - प्रविष्ठ विद्यार्थी - ३४

**NTS-NMMS परीक्षा अहवाल**

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा व राष्ट्रीय आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्या करिता आयोजीत करण्यात येणा-या परीक्षेसाठी सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात इ.८वीतील विद्यार्थी NTS-NMMS या परीक्षांना दरवर्षीप्रमाणे प्रविष्ठ झाले होते. NTS परीक्षा ५१ विद्यार्थी NMMS परीक्षा ३५ विद्यार्थी बसले. या परीक्षांचा निकाल लागला. **NTS या परीक्षेचा निकाल ७१%** तर **NMMS चा निकाल ६६% लागला**. प्रशालेच्या ०४ विद्यार्थ्यांना **NMMS शिष्यवृत्ती** मिळाली. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची नांवे पुढीलप्रमाणे

१. कु.जोगळेकर प्राजक्ता अरुण २. कु. लिमये कपिल सुनिल ३. कु. पाटील नेहाल मंगेश

२. कु. शिगवण पूजा अनंत

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात NTS परीक्षेसाठी २५ विद्यार्थी व NMMS परीक्षेसाठी १९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले .

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा**

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरिता इ.५ वी तून ४१ तर इ.१० वी मधून प्रथमच ११ विदयार्थी असे एकूण १०० विदयार्थी **इतिहास प्रज्ञा शोध** परीक्षेस प्रविष्ठ झाले या परीक्षेसाठी श्री.पोवार सर यांनी मोलाचे सहकार्य केले. या **परीक्षेचा निकालइ. ५ वी ६५% व इ. ८वी ८५%** लागला आहे. सन २०१२-१३ साठी सदर परीक्षेसाठी १०० विद्यार्थी परीक्षेस बसले आहेत.

**बाहयपरीक्षा**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) आणि आयकन्सेट या संस्थांनी सुरु केलेल्या महाराष्ट्र ऑलिंपीयाड अभियान चळवळीच्या सबज्युनियर ऑलिंपियाड स्पर्धा परीखेत कु.तेजस साखळकर (७वी) विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्याच्या ३५ जणांच्या यादील ८ वे स्थान पटकावले आहे.

रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हयातून एकमेव ऑनलाईलन परीक्षा २ लेव्हल मध्ये घेण्यांत आली.पहिल्या लेव्हलला ९०% व दुसया लेवहलला ७५% रौप्यपदक,प्रमाणपत्र व रु.१५००/- ची पुस्तके -पारितोषिक

सायन्स ऑलिंपियाड फाऊंडेशन (SOF) दिल्ली यांच्यामार्फत घेण्यांत आलेल्या International Mathematics Olympiad (IMO) परीक्षेत कु.तेजस साखळकर हा पहिल्या लेव्हलला स्कूल टॉपर गोल्ड मेडल व पणजी येथे झालेल्या दुसया लेव्हलच्या परीक्षेत ९०% गुण मिळवून महाराष्ट्र व गोवा या राज्यांमध्ये दुसरा क्रमांक आला असून इंटरनॅशनल रँक १४ वा आला आहे. सिल्वर मेडल ,प्रमाणपत्र रु. २५००/- रोख बक्षिस ,भेटवस्तू.

प्री.एन.टी.एस.परीक्षा जळगाव इ.७वी साठी घेण्यांत आलेल्या या परीक्षेत २०० पैकी १९१ गुण मिळवून कु.तेजस साखळकर राज्यात प्रथम. जूनमध्ये सत्कार होणार आहे.(बक्षिस रोख रक्कम रु.१०,०००/- व प्रमाणपत्र)

**वाचू आंनदे अभियान**

आपल्या संस्थेचे विद्यमान कार्याध्यक्ष मा.ॲड.विलासजी पाटणे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनातून वाचू आनंदे वाचन संस्कृती अभियान सुरु झाले. सुप्रसिध्द कवी दासू वैद्य यांच्या उपस्थितीत या अभियानाचा उद्‌घाटन समारंभ सावरकर नाटयगृहात उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.

या अभियानांतर्गत आस्वाद कार्यशाळा,दिवाळी अंक वाचन स्पर्धा, मला आवडलेले पुस्तक या विषयावर वक्तृत्व स्पर्धा असे संपन्न झाले.विद्यार्थ्यांच्या वाचनास प्रोत्साहन मिळावे वाचाल तर वाचाल या ध्येयाने वाचता-वाचता चिंतन करावे, लिहिते व्हावे असा सद्‌हेतू यामागे आहे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी प्रशालेतील सर्व मराठी विषयाच्या शिक्षकांची एक उपसमिती करण्यांत आली आहे. या उपसमितीचे श्री.माळगे व श्री.देवळेकर हे काम पाहतात.

**कला विभाग**

**महाराष्ट्र शासनाची बाल चित्रकला स्पर्धा -** सहभागी विद्यार्थी २३५
बाल चित्रकला स्पर्धा १३ ऑगस्ट २०१२

**शासकीय रेखा व रंगकला परीक्षा (चित्रकला ग्रेड परीक्षा एलिमेंटरी /इंटरमिजिएट)**
चित्रकला ग्रेड परीक्षा सप्टेबर - २०१२ प्रविष्ठ विद्यार्थी - ७३
एलिमेंटरी चित्रकला ग्रेड परीक्षा - सहभागी विद्यार्थी - ४३ उत्तीर्ण -४१
A - ०५, B - ०७, C - २९ निकाल - ९५.३४%
इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षा - सहभागी विद्यार्थी - ३०
A - ०९, B - १४, C - ०७ निकाल - १००%

**सामाजिक वनीकरण आयोजित चित्रकला स्पर्धा (जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा)- प्रविष्ठ विद्यार्थी - ९५**
प्राथमिक गट - सहभागी विद्यार्थी - ६०
माध्यमिक गट - सहभागी विद्यार्थी - ३५
**यशस्वी विद्यार्थी** - कु. तेजस दिपक पोमेडकर - प्रथम क्रमांक (प्राथमिक गट )

**बॅक ऑफ इंडीयाच्या वर्धापन दिनानिमित्त शालेयस्तरावरील चित्रकला स्पर्धा - सहभागी विद्यार्थी- २७५**
**यशस्वी विद्यार्थी**
कु. अमेय अशोक सुर्वे प्रथम (रोख २१००/- रु. व प्रमाणपत्र )
कु. प्रणय उदय लिंगायत व्दितीय ( रोख १५००/- रु. व प्रमाणपत्र )
कु. ऋतुजा सुरेश शिंदे तृतीय (रोख ११००/- रु. व प्रमाणपत्र )

कु. अपेक्षा अनिल सुतार उत्तेजनार्थ ( रोख ५००/- रु. व प्रमाणपत्र )
कु. सुयश गोपाळ सावंत उत्तेजनार्थ ( रोख ५०/- रु. व प्रमाणपत्र)

**लायन्स क्लब आयोजित चित्रकला स्पर्धा**
आंतरराष्ट्रीय शांतता पोस्टर स्पर्धा ( दि. २१ ऑक्टोबर २०१२ ) - सहभागी विद्यार्थी - १०

**मायफ्रेंड गणेशा अर्थात गणेशमुर्ती बनविण्याची स्पर्धा - संयोजक - आर्ट सर्कल , रत्नागिरी सहभागी विद्यार्थी - १०**

**शारीरिक शिक्षण विभाग**

1. आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग खुल्या बुध्दिबळ स्पर्धा - कुपवाड,सांगली, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त (१४९०),SMCA चा बेस्ट अनरेटेड प्लेअर - प्रथम पारितोषिक
2. प्रतिरंग चेस ॲकॅडमी चिपळूण मार्फत घेण्यांत आलेल्या खुल्या बुध्दिबळ स्पर्धेत व्दितीय क्रमांक रु.६५१ व प्रमाणपत्र
3. १३ वर्षाखालील जिलहास्तरीय बॅंडमिटन स्पर्धा - प्रथम क्रमांक वरील सर्व स्पर्धाच्या मध्ये इ.७ वी अ मधील कु. तेजस साखळकर याने यश संपादन करुन प्रशालेच्या आणि संस्थेच्या नावलौकिकात भर टाकली आहे.

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात प्रशालेतील अनेक विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये राष्ट्रीय पातळीवर भरारी मारली आहे.यामध्ये कु.पूर्वा शिवराम किनरे (योगा),कु.श्रध्दा वासुदेव लाड(खो-खो),कु.अपेक्षा अनिल सुतार (खो-खो),कु.एश्वर्या यशवंत सावंत(खो-खो),कु.दिव्या संजय भोरे(धावणे),कु.प्रथमेश राजेंद्रकुमार नाचणकर (क्रिकेट),कु.अभिषेक कांबळे(तायक्वॉंदो ),कु.हर्षल विजय आखाडे(थ्रोबॉल),कु.तेजस साखळकर (बुध्दिबळ)इ.विद्यार्थी चमकले आहेत.यांच्या यशासाठी शाळा ते मारुतीमंदिर अशी भव्य रॅली काढण्यात आली.

तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत वेगवेगळया खेळामध्ये यश संपादन केलेले खेळाडू

**१. खो-खो** :- १४ मुलीचा व १७ मुलीचा संघ या स्पर्धेमध्ये विजयी ठरले.
**२. मैदानी स्पर्धा** :- १४ मुलीचा व १४ मुलांचा संघ , १७ मुलीचा व १७ मुलांचा संघ वेगवेगळया वैयक्तिक स्पर्धेत यश संपादन केले आहे.
**३. कबड्डी** :- १४ मुलीचा व १४ मुलांच्या संघाने या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

जिल्हास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन यश संपादन केले. त्यामध्ये शालेय फुटबॉल,सुब्रतो मुखर्जी
फुटबॉलस्पर्धा,कॅरम,जलतरण,बॅडमिंटन,बॉक्सिंग,च्यायक्वांदो,योगासन,तायक्वांदो,बुध्दिबळ,थ्रोबॉल,हॅंडबॉल, बास्केटबॉल,क्रीक्रेट ,मैदानी स्पर्धा,खो-खो इ. खेळामध्ये विद्यार्थ्यानी यश संपादन करुन विभागीय स्पर्धेत सहभाग झाले.

कोल्हापूर विभागीय शासकीय क्रीडा स्पर्धेत भाग घेऊन विद्यार्थ्यानी यश संपादन केले आहे. यामध्ये बुध्दीबळ,जलतरण,बॉक्सिंग,योगासन,तायक्वांदो,थ्रोबॉल,क्रीक्रेट,मैदानीस्पर्धा,खो-खो इ. खेळामध्ये विद्यार्थ्यानी यश संपादन करुन राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग झाले.

राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये खो-खो,क्रिकेट,मैदानी स्पर्धा, थ्रो बॉल,योगासन, जलतरण, तायक्वॉंदो इ. स्पर्धामध्ये संघ सहभागी होऊन यश संपादन केले व त्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे :-

१. क्रीक्रेट - कु. प्रथमेश राजकुमार नाचणकर - ९ वी अ
२. मैदानी स्पर्धा- कु. दिव्या भोरे - ९ वी इ
३. योगासन - कु. पूर्वा किनरे - ७ वी अ
४. थ्रोबॉल - कु. हर्षल आखाडे - ९ वी ड

५. तायक्वांदो - कु. अभिषेक कांबळे - १० वी ड
६. खो-खो - कु. श्रध्दा लाड - ८ वी अ **सुवर्ण पदक विजेती**

दि. २१.१२.१२ रोजी झालेल्या प्रशालेचा वार्षिक क्रीडामहोत्सवातील स्पर्धेमध्ये विविध खेळामध्ये खालील वर्ग विजयी व उपविजयी ठरले-

| | | |
|---|---|---|
| फुटबॉल स्पर्धा (इ.८वीते१०वी ) | विजयी -१० वी अ | उपविजयी - १० वी ड |
| लगोरी स्पर्धा (मुली) (इ.८वीते१०वी ) | विजयी - ९ वी इ | उपविजयी - १० वी क |
| अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा (मुले) (इ.५वीते७वी ) | विजयी - ७ वी ड | उपविजयी - ७ वी क |
| लंगडी स्पर्धा(मुली) (इ.५वीते७वी ) | विजयी - ७ वी अ | उपविजयी - ६ वी अ |

**स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग अहवाल**

स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग हे दोन विभाग प्रशालेमध्ये सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन करतात. सन २०१२-२०१३ या वर्षी अत्यंत खेळामेळीच्या वातावरणात स्वराज्य सभा निवडणूक दि.२६/०७/२०१२ रोजी पार पाडल्या.यामध्ये कुमार चैतन्य श्रीरंग वैद्य विद्यार्थी प्रतिनिधी व कुमारी मयुरी भरत भुवड हिची विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून निवड झाली. याच दिवशी पहील्या तासिकेला सर्वच वर्गातून वर्गशिक्षकांनी वर्गप्रतिनिधिची निवडणूक घेतली. सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे मा.मुख्याध्यापक श्री.कांबळे सर यांनी अभिनंदन केले. हा निवडणूकीचा कार्यकम यशस्वी पार पाडण्यामध्ये सर्वच पदाधिकारी व शिक्षकवृंद तसेच सेवक वर्गाचे सहकार्य मिळाले.

❖ **गुरुपौर्णिमा (व्यास पौर्णिमा) - ३ जुलै २०१२**

सकाळ सत्रामध्ये इ.७वीतील विद्यार्थी व दुपार सत्रातील इ.९वीतील विद्यार्थ्यांनी गीत भाषण,नाटक इ. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

❖ **लोकसंख्या विस्फोट दिन -११ जुलै २०१२**

लोकसंख्या विस्फोट दिनानिमित्त सकाळ सत्रामध्ये श्रीम.ढोले मॅडम यांचे व्याख्यान आयोजीत केले होते तर दुपार सत्रामध्ये सौ.काजरेकर मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यांत आले.

❖ **लोकमान्य टिळक पुण्यतिथि - १ ऑगस्ट २०१२**

सकाळ सत्रामध्ये प्रमुख पाहुण्या-श्रीम. पिलणकर मॅउम या होत्या.तर दुपार सत्रामध्ये माजी मुख्याध्यापक श्री.सोहनी हे प्रमुख वक्ते होते.

❖ **रक्षाबंधन आणि संस्कृतदिन- ३ ऑगस्ट २०१२**

सकाळ सत्रामध्ये प्रमुख पाहुण्या श्रीम. सुवर्णा पत्की(जिल्हा पोलीस निरीक्षक )यांना निमंत्रित केले होते. दुपार सत्रात प्रशालेच्या माजी संस्कृत शिक्षिका सौ.वंदना घैसास यांना निमंत्रित केले होते. हया कार्यक्रमाला काही अपरिहार्य कारणामुळे मान. मुख्याध्यापक उपस्थित राहू शकले नाहीत. उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

❖ **क्रांतिदिन - ९ ऑगस्ट २०१२**

या दिवसाचे महत्व सांगण्यासाठी सकाळ सत्रामध्ये श्री.वामन दांडेकर यांना आंमत्रित केले होते.त्यानी वंदेमातरम या विषयी अतिशय मोलाची माहीती दिली.दुपार सत्रात श्रीम.जोशी मॅडम या प्रमुख वक्त्या होत्या . यांनी स्लाईड शो च्या माध्यमातून सशस्त्र,क्रांती कशी घडून आली हे विदयार्थ्यांना सांगितले .या कार्यक्रमासाठी मा.मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

❖ **१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन प्रशालेत मा. मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजारोहण करुन संपन्न झाला.

❖ **शिक्षक दिन - ५ सप्टेबर २०१२**

प्रशालेत स्वयंशासन दिन इ.१० वी च्या विद्यार्थ्यांनी साजरा केला. या दिवसाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन स्वराज्य सभा आणि सांस्कृतिक विभाग यातील प्रमुख सदस्यांनी केले होते. सकाळी ७.२० ते १०.२५ या वेळेत विद्यार्थ्यांनी १ ते ६ तासिका घेतल्या.संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि माजी शिक्षकांनी,पालकांनी या वेळेत शाळेलाभेटदिली.मा.मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक व शिक्षकांच्या मदतीने कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला.

❖ **महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती - २ ऑक्टोबर २०१२**

या दिवशी दोन्ही सत्रामध्ये मिळून कार्यक्रम घेतला जातो. प्रमुख वक्ते श्री.कांबळे आर वाय. यांनी लाल बहादूर शास्त्रींविषयी आपले विचार मांडले. तर श्री. चव्हाण ए.पी. सरांनी महात्मा गांधीबद्दलचे आपले मनोगत व्यक्त केले. विदयार्थ्यांनीही आपले विचार व्यक्त केले. विदयार्थ्यांनी या दिवशी परिसर स्वच्छताही केली.

❖ **रंजन मंदिर नुतनीकरण समारंभ - २२ सप्टेंबर २०१२**

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या रा.भा.शिर्के प्रशालेचे सांस्कृतीक सभागृह असलेल्या रंजनमंदिर नुतनीकरणाचा शुभारंभ सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी प्रमुख पाहुणे श्री.प्रकाशजी जावडेकर,श्री.सुरेशजी प्रभू आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.या सर्व कार्यक्रमाना मा.मुख्याध्यापकानी,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक,सर्व शिक्षकवर्ग,सेवकवर्ग यांचे मोलाचे सहकार्य प्राप्त झाले.

**परीक्षा विभाग अहवाल**

रा.भा.शिर्के प्रशालेमध्ये परीक्षा विभाग अत्यंत चांगल्या प्रकारे परीक्षेचे नियोजन व संयोजन करीत असतो. इ. ५वी ते १० वी पर्यतच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचे काम परीक्षा विभाग मा. मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली करीत असतो. इ.५वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचण्या,सत्र १, सत्र २ परीक्षा व इ. १० वीच्या सराव परीक्षा,पूर्व परीक्षा परीक्षा विभागामार्फत घेतल्या जातात. तसेच या कामासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे चांगले सहकार्य मिळते. सकाळ सत्र परीक्षा विभाग प्रमुख श्री.शेलार सर व दुपार सत्रासाठी श्री.चव्हाण आर.बी. सर, श्री.कदम सर काम पाहतात. श्री.दयांनद कांबळे व श्री.वजरेकर हे सेवक यांची मदत मिळते.परीक्षा विभागासाठी मा.मुख्याध्यापकांच्या बरोबर उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक यांचेही उत्तम मार्गदर्शन लाभते. त्यामुळे परीक्षा यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी परीक्षा विभाग प्रयत्नशील असतो.

**स्पर्धा विभाग अहवाल**

प्रतिवर्षाप्रमाणे सन २०१२-१३ या चालू शै.वर्षातही विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.

१. **रत्नागिरी नगर परिषद आयोजित लो.टिळक तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा**

द्वितीय क्रमांक :- कु. चव्हाण मीरा सुहास

२. **रत्नागिरी नगर परिषद बालकल्याण विभाग आयोजित काव्यस्पर्धा**

प्रथम क्रमांक :- कु. गायत्री दर्शन देसाई उत्तेजनार्थ :- कु. प्रज्चल विकास तेंडुलकर

३. **गीतामंडळ रत्नागिरी आयोजित**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भक्तीगीत स्पर्धा :- | कु. प्राजक्ता जोगळेकर | प्रथम | कु .प्रगती दिनकर माळी | तृतीय |
| सुलेखन स्पर्धा :- | कु. वनश्री किशोर कांबळे | तृतीय | कु. ऐश्वर्या वसंत म्हात्रे | उत्तेजनार्थ |

**४. चाटे स्कूल ऑफ ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स कोल्हापूर आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा**
प्रथम क्रमांक :- कु. कस्तुरी भास्कर भागवत

**५. रा.भा.शिर्के प्रशाला आयोजित संस्थांतर्गत निबंध स्पर्धा**
( गट २ ) प्रथम क्रमांक कु. साध्वी दिपक राजवाडे द्वितीय क्रमांक कु. अथर्व राजेश नेने
तृतीय क्रमांक कु. भूषण प्रमोद वायंगणकर
( गट ३ ) द्वितीय क्रमांक कु. कोमल रमेश रावणंग तृतीय क्रमांक कु. अपूर्वा विद्याधर सरदेसाई

**६. जी.जी.पी.एस. आयोजित संस्थार्गत गीतगायन स्पर्धा**
प्रथम क्रमांक (गट २) कु. सावनी शिरीष शंबवणेकर तृतीय क्रमांक (गट३) कु. प्राजक्ता जोगळेकर
उत्तेजनार्थ कु. शुभंकर दांडेकर

**७. सौ.गोदूताई जांभेकर विद्यालय आयोजित संस्थातर्गत पठण स्पर्धा**
तृतीय क्रमांक :- कु. कल्पेश संजय कांबळे

**८. शांताराम यशवंत गोडबोले माध्यमिक विद्यालय,केळये संस्थातर्गत हस्ताक्षर स्पर्धा**
( गट १ ) प्रथम क्रमांक कु. गुरुप्रसाद सुभाष नाचणकर द्वितीय क्रमांक कु. भक्ती शिवाजी पाटील
तृतीय क्रमांक कु. प्राची दिपक माळी
( गट २ ) उत्तेजनार्थ कु. रेणुका विजय सरदेसाई

**९. कै. ल.ग.पटवर्धन प्राथमिक विदयामंदिर, रत्नागिरी आयोजित संस्थांतर्गत वक्तृत्व स्पर्धा**
( गट ३ ) प्रथम क्रमांक कु. प्राजक्ता श्रीरंग वैद्य द्वितीय क्रमांक कु. साध्वी दिपक राजवाडे
तृतीय क्रमांक कु. अथर्व राजेश नेने
( गट ४ ) द्वितीय क्रमांक कु. राहुल मंगेश सरदेशपांडे तृतीय क्रमांक कु. नेहा राजेश नेने
उत्तेजनार्थ कु. स्नेहल प्रविण सुर्वे

**१०. मालतीबाई जोशी प्राथमिक विदयामंदिर, रत्नागिरी आयोजित संस्थांतर्गत कथा-कथन स्पर्धा**
( गट ३ ) द्वितीय क्रमांक कु. कु. अथर्व राजेश नेने तृतीय क्रमांक कु. साध्वी दिपक राजवाडे
( गट ४ ) प्रथम क्रमांक कु. आसावरी अरुण आखाडे द्वितीय क्रमांक कु. नेहा राजेश नेने
तृतीय क्रमांक कु. कस्तुरी भास्कर भागवत

**NCC विभाग**

सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात इ.८ वी मधून प्रथम वर्षात १५ विद्यार्थी व ०८ विद्यार्थिनी तसेच व इ. ९ मधील १८ विद्यार्थी व ०९ विद्यार्थिनी असे ५० NCC कॅडेटची प्रशिक्षणासाठी निवड केली आहे.

या वर्षी **०३ पी.ओ कॅडेट :** - १.प्रज्वल तेडूलकर २.साहिल चव्हाण ३.स्नेहा भोसले तसेच **६ लिडींग कॅडेट :** - १.शुभंम चवेकर २.ऋषिकेश पटवर्धन ३.श्रध्दा कालेकर ४.अनिकेत वाडकर ५.ओकार हट्टीकर

६.मीरा चव्हाण यांची निवड झाली N.C.C. विभाग प्रमुख म्हणून चिफ ऑफिसर श्री.सी.एस.पाटील काम पहात आहेत.

**विविध सामाजिक व शालेय उपक्रमातील सहभाग :-**

**१.स्वच्छ रत्नागिरी जनजागरण फेरी**

२. **१५ ऑगस्ट : - स्वातंत्र दिन**

**३. ०८ सप्टेंबर २०१२ : - जागतिक साक्षरता दिन**

**४. सागर किनारा स्वच्छता मोहिम**

५. NCC Day

६. A.T.C.कॅम्प - कुवारबाव

७. मे २०१२ INC camp

८. २६ जानेवारी - **प्रजासत्ताक दिन**

**महाराष्ट्र छात्र सेना**

आपल्या रा.भा.शिर्के प्रशालेत महाराष्ट्र छात्र सेना हे चालते इ.८ वी ९वी च्या विद्यार्थ्यांना हा विषय ऐच्छिक ठेवण्यात आला आहे यावर्षी सन २०१२-१३ इ.८ वी च्या मुला -मुलीची संख्या १३७ आहे तर इ.९ वी ची संख्या ११० अशी आहे इ.८ वी व ९ वी ची संख्या एकूण २४७ आहे.

स्वामी विवेकानंद शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त कार्यक्रम शोभायात्रा मारुती मंदिर ते प्रमोद महाजन क्रीडा संकुल पर्यंत विद्यार्थी व शिक्षक यांचा सहभाग.

महाराष्ट्र छात्र सेना रत्नागिरी तालुका ड्रील स्पर्धा या स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग.

१ मे महाराष्ट्र दिन झेंडावंदन शिवाजी स्टेडियम पालकमंत्री यांच्या उपस्थितीत पार पाडला. या ठिकाणी शाळेपासून काढलेल्या प्रभातफेरीत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**विज्ञान विभाग**

राज्य विज्ञान शिक्षण संस्था,नागपूर यांच्याकडून तालुका,जिल्हा व राज्यस्तरीय प्रदर्शन आयोजित केले जाते. यावर्षीचा विषय होता - ऊर्जा,साधनसंपत्ती व संरक्षण, या विषयाशी निगडीत आयोजित केलेल्या प्रदर्शनात प्रशालेने सर्व प्रकारांत घवघवीत यश संपादन केले.

**प्रतिकृती /मॉडेल** : मॉडेल गोबरगॅस/बायोगॅस धनप्राप्ती सिलेंडर. मॉडेल बनविणारे विद्यार्थी - इ.६वीतील शुभम संजय वर्तक,वायंगणकर भूषण प्रमोद.

१. **तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन** : - तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. १२,१३,१४ डिसेंबर २०११ रोजी नेवरे हायस्कूल येथे आयोजित केले होते. येथे मॉडेलला तिसरा क्रमांक मिळाला व जिल्हा स्तरासाठी निवड झाली.

२. **जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन** :-जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन डेरवण येथे दि . २१,२२,२३ डिसेंगरला आयोजित केले होते. येथे मॉडेलला दुसरा क्रमांक मिळाला व राज्यस्तरासाठी निवड झाली.

३. **राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन : -** राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. २८ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१२ रोजी बारामती येथे झाले. मॉडेल-गोबरगॅस/बायोगॅस धनप्राप्ती सिलेंडर-तिसरा क्रमांक मिळाला व जिल्हातरासाठी निवड झाली. मॉडेल बनविणारे विद्यार्थी - इ. ६वीतील शुभय संजय वर्तक, वायंगणकर भूषण प्रमोद सर्व प्रदर्शनाकरिता विद्यार्थ्यांना श्री.पडवेकर सर, सौ. अभ्यंकर मॅडम, सौ. पवार मॅडम या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

४. **शालांतर्गत विज्ञान प्रदर्शन :-** दि.२८ फेब्रुवारी २०१२ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन व कै.अरूअप्पा जोशी स्मृतीदिनानिमित्त शालांतर्गत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले गेले. त्या अंतर्गत प्रश्नमंजुषा, वैज्ञानिक उपकरण निर्मिती इ. विविध स्पर्धा घेण्यांत आल्या . सदर विज्ञान प्रदर्शनामध्ये २८० विद्यार्थ्यांनी१३६ उपकरणांसहित सहभाग घेतला होता. प्रदर्शनास उद्‌घाटक म्हणून जी.जी.पी.एस. च्या सौ.पाटणकर मॅडम उपस्थित होत्या तर परीक्षक म्हणून सौ.प्रज्ञा दळी व सौ.पाटणकर मॅडम यांनी काम पाहिले. सदर कार्यक्रमास मा.

मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता.सर्व विज्ञान शिक्षकांनी सदर कार्यक्रम नियोजनपूर्वक पार पाडला.

**विज्ञान नाटीका : - अधिक अधिक वजा.**

प्रशालेतील९ विद्यार्थी सहभागी झाले होते. याला तिसरा क्रमांक मिळाला.

**प्रश्नमंजुषा : -**

या स्पर्धेसाठी इ. ९वीतील तीन विद्यार्थी सहभागी झाले.

**विज्ञान मंच परिक्षा : -**

विज्ञान मंच परिक्षा राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्याकडून आयोजित केली जाते. या परीक्षेसाठी इ. ७वीमधून विद्यार्थी निवडले गेले.

**विज्ञान रंजन परिक्षा : -**

विज्ञान रंजन परिक्षा रत्नागिरी जिल्हा विज्ञान शिक्षक मंडळ,रत्नागिरी यांच्याकडून आयोजित केली जाते.प्रशालेतील प्राथमिक गटात ३४/६८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा : -**

डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचे आयोजन मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन यांच्याकडून केले जाते. इ.६वीतून ११ विद्यार्थी व इ.९वीतून ५ विद्यार्थी सहभागी झाले होते. पहिला राऊंड प्रॅक्टिकलसाठी इ.६वीतून कु.तेजस साखळकरव इ.९वीतून कु.चैतन्य वैद्य यांची निवड झाली. तसेच याच दोघांची पहिला राऊंड होऊन दुसया प्रोजेक्ट राऊंडसाठी निवड झाली. तिसया राऊंडमध्ये कु.तेजस साखळकर यास रौप्य पदक तर कु.चैतन्य वैद्य यास सुवर्ण पदक प्राप्त झाले.

**विज्ञान छंद मंडळ**

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षासाठी विज्ञान छंद मंडळाची स्थापना जुलै महिन्यात करण्यांत आली. या विज्ञान छंदमंडळाची कार्यकारिणी निवडण्यांत आली. तसेच शाळेमध्ये याअंतर्गत विज्ञान दिन साजरा करण्यांत आला.

**गणित प्राविण्य परिक्षा : -**

गणित अध्यापक मंडळ गणित प्राविण्य व प्रज्ञा परीक्षा आयोजित करते. प्रशालेचे ०९/३३ विद्यार्थी सहभागी झाले. इ. ५ वीतून ३/२४ विद्यार्थी व इ. ८वीतून ६/९ विद्यार्थी यशस्वी होऊन प्रज्ञा परीक्षेसाठी पात्र झाले.

**Science Olympiad Foundation, Delhi : -**

Science Olympiad Foundation यांच्यामार्फत विविध स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात. यावर्षी विद्यार्थ्यांचा सहभाग खालीलप्रमाणे : -

❖ International Maths Olympiad :

या परीक्षेत इ.६वीतील कु.तेजस साखळकर यांने स्कुल रॅक -१ स्टेट रॅक -२७ व इंटरनॅशनल रॅक - ३३० प्राप्त केली. तसेच इ.५वीतील कु.अर्थव सरदेशपांडे याने स्कुल रॅक - १,स्टेट रॅक - ९९८ व इंटरनॅशनल रॅक - ५१३८ प्राप्त केली.

❖ National Science Olympiad :

या परीक्षेत इ.६वीतील कु.तेजस साखळकर यांने स्कुल रॅक -१ स्टेट रॅक - ४१७ व नॅशनल रॅक - २९०७ प्राप्त केली. तसेच इ.७वीतील कु.विवेक विवेकानंद कुवळेकर याने स्कुल रॅक - १,स्टेट रॅक - ४५७ व नॅशनल रॅक - ३४१० प्राप्त केली. तिन्ही विद्यार्थी सेकंड राऊंडसाठी गोवा येथे उपस्थित राहिले होते.

या ही शैक्षणिक वर्षी (२०१२-१३) घेतल्या गेलेल्या ऑलिंपियाड परीक्षेसाठी N.S.O. ला ५६, I.M.O. ला ५२ आणि I.E.O. ला ५७ असे १६५ विदयार्थी सहभागी झाले आहेत. शै.वर्ष २०११-१२ च्या एप्रिल १२ मध्ये घेतल्या गेलेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेला २९ विदयार्थी सहभागी झाले होते. पैकी २१ जण उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेचा निकाल ७२.१४% लागला आहे.

**ग्रंथालय विभाग**

प्रशालेमध्ये सुसज्ज ग्रंथालय असून त्यामध्ये सुमारे **९,७००** पुस्तके आहेत. यामध्ये विविध ग्रंथ,संदर्भग्रंथ,विश्वकोश,चरित्रात्मक,प्रवासवर्णने,क्रीडाविषयक,कविता संग्रह,स्वामी विवेकानंद ग्रंथावली,भगवद्गीता अशा विविध प्रकारांनी भरलेले समृध्द ग्रंथालय आहे. विद्यार्थ्याना आठवडयातून दोन वेळा पुस्तके घेता येतात. विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ मोठ्या प्रमाणावर घेतात. जास्तीत जास्त पुस्तके वाचणाया विद्यार्थ्याना बक्षिसे दिली जातात.संस्थेच्या वाचू आनंदे उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यासाठी विविध उपक्रम संस्थेने आयोजित केले आहेत.ग्रंथालयाचे काम ग्रंथपाल सौ.चव्हाण मॅडम उत्तम प्रकारे पार पाडत आहेत.

**व्यवसाय मार्गदर्शन**

व्यवसाय मार्गदर्शन विषयाअंतर्गत विद्यार्थ्यासाठी विविध उप्क्रम व प्रकल्प कामाचे आयोजन करण्यात येते.वर्ष २०१२-२०१३ साठी इ.१० वी च्या विद्यार्थ्यानसाठी अभिरुची चाचणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी श्री.धोत्रे व श्री.रहाटे या समुपदेशकाना निमंत्रीत करण्यात आले.अभिरुची चाचणीसाठी विद्यार्थ्याचा उत्तम प्रतिसाद मिळाला अभिरुची चाचणीचा निकाल हस्तांतरीत करताना विद्यार्थी व पालकाना सामुहिक व वैयक्तीक समुपदेशन करण्यात आले.समुपदेशन कार्यक्रमानिमित्ताने प्रशालेच्या सभागृहात करीअर व अभ्यासक्रमासंबंधीची माहिती देणा-या तक्त्यांचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले.

व्यवसाय मार्गदर्शन विभागांतर्गत इ.९ वी व १० वी च्या विद्यार्थ्याच्या पालकांसाठी '**मुले घडवताना** 'या व्याख्यानपर उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सौ.सुखदा गोळे मानसशास्त्रज्ञ,समुपदेशक मुंबई यांना सदर कार्यक्रमासाठी निमंत्रीत करण्यात आले. या उद्बोधन कार्यक्रमामध्ये मार्गदर्शकानी किशोरवयीन मुलांच्या समस्या व करीअर निश्चिती यासाठी पालकांची भूमिका या संर्दभात अतिशय प्रभावी आणि परीणामकारक आपले विचार मांडले पालकांच्या शंकाचे मार्गदर्शकानी उत्तम पद्धतीने समाधान केले.

व्यवसाय मार्गदर्शन विषयांतर्गत विद्यार्थ्याचे गटवार प्रकल्पकार्य करुन घेतले जाते .या निमिताने विद्यार्थ्यी शिक्षण संस्था,अभ्यासक्रम ,व्यवसाय क्षेत्रे,व्यक्तीमत्व विकास इ.अनेक विषयांची तपशीलवार माहिती असणारे अतिशय उपयुक्त प्रकल्प तयार करतात.सन २०११-१२ साठी विद्यार्थ्यानी अनेक संग्रहात्मक व संशोधनपर प्रकल्प तयार केले आहेत.

**सालसेप ( २०१२-१३)**

शालेय किशोरावस्था जीवन कौशल्य शिक्षण कार्यक्रम (सालसेप)

**सालसेप विभागातर्फे विद्यार्थिनीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम**

- **१ ऑक्टोंबर २०१२ जागतिक रक्तदान दिन**

या दिनांच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना रक्त व रक्तदान या संबंधी सालसेप विभागप्रमुख सौ.पाटील एस्.एन् यांनी सखोल मार्गदर्शन करून जाणीवजागृती करून दिली तसेच जागतिक रक्तदान दिन या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

- **१० ऑक्टोंबर २०१२**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला नोडल टीचर सौ. पाटील यांनी सालसेप अंतर्गत माहिती दिली. यामध्ये किशोरावस्था काळात होणारे शारीरिक बदल,घ्यावयाची काळजी व स्वच्छता याविषयी वयात येताना या विषयावर प्रॉक्टर अॅड गॅम्बल या कंपनीच्या ( DME ) म्हणून कार्यरत असणाऱ्या सौ.प्रिया जाधव यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थिनीच्या शंकाचे निरसन केले.

- **८ डिसेंबर २०१२**

इ. ९ वी १० वीच्या विद्यार्थ्यासाठी सिव्हील हॉस्पीटलच्या मैत्री सेवा केंद्राची माहिती तसेच या केंद्रामार्फत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यांत आली.यासाठी सिव्हील हॉस्पीटलच्या डॉक्टर श्रीमती प्रज्ञा ठाकूर उपस्थित होत्या.एडस सप्ताहानिमित्ताने विद्यार्थ्यामध्ये एडस रोगाविषयी त्यांनी मार्गदर्शन जाणीवजागृती केली. तसेच किशोरवयीन विद्यार्थ्याच्या समस्यांतर्गत एलसीडी चा वापर करुन चित्रफीत दाखविण्यात आली.रविवार दि.२० जानेवारी २०१२ रोजी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत जनजागृती म्हणून सालसेप विभागामार्फत शनिवार दि.१९ जानेवारी रोजी प्रभातफेरी काढण्यात आली.

**राष्ट्रीय हरितसेना**

राष्ट्रीय हरितसेनांतर्गत फिनोलेक्स कंपनीच्या संयोगाने हरितसेना विभागातील मुलांना झाडे वाटप करण्यात आली. त्या झाडांची निगा त्या विद्यार्थ्यानी करायची आहे. या उपक्रमासाठी फिनोलेक्स जनसंपर्क अधिकारी श्री.सावंत सरांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर गणपती विसर्जनाच्यावेळी निर्मालय विलहेवाट योग्यप्रकारे करण्याच्य संदर्भात तसेच दिवाळीच्यावेळी फटाके कमी वाजवून ध्वनी प्रदूषण कमी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**संगणक विभाग**

प्रशालेमध्ये प्रशस्त असा संगणक कक्ष आहे. यामध्ये २० संगणक असून इयत्ता १ली ते १० वी पर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत असतात.

**भारत स्काऊट /गाईड विभाग**

आपल्या रा.भा.शिर्के प्रशालेत भारत स्काऊट आणि गाईड हे पथक चालते. सन २०११-१२ या वर्षात आपल्या प्रशालेतील स्काऊट पथकाने खूप उत्कृष्ट कामगिरी केली आहे.यामध्ये सात स्काऊटना राज्यपुरस्कार प्राप्त झाला आहे. **राज्य पुरस्कार प्राप्त स्काऊट** - १) कु. चैतन्य वैद्य २) कु. ओकार सावंत ३) कु. साईराज पवार ४) कु. अभिषेक नागले ५) कु.शशांक मांजरेकर ६) कु. सुमित चवेकर ७) कु. हेमंत अवजरे याशिवाय **२२ स्काऊट हे पंतप्रधान ढाल स्पर्धा** यासाठी प्रवेश पात्र झाले आहे. सन २०११-१२ यावर्षी **राज्य मेळावा,पुणे येथे १० स्काऊट सहभागी** तसेच **जिल्हा मेळावामध्ये स्काऊट व गाईड** यांना प्रथम क्रमांकाची २, व्दितीय क्रमांकाची ३ व तृतीय क्रमांकाचे १ अशी **०६ बक्षिसे** मिळाली आहेत. तसेच **मुंबई** येथे **राज्यपालांच्या** हस्ते होणाऱ्या **राज्य पुरस्कार सोहळयाला** आपल्या **प्रशालेतील स्काऊट चैतन्य वैद्य** याला **उपस्थित राहण्याची संधी** मिळाली होती.

**गरीब विद्यार्थी निधी**

प्रशालेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक आणि शालोपयोगी साहित्य देऊन हातभार लावणे हा या योजनेमागील हेतु असून त्यामुळे विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी अधिक उद्युक्त होतात असा अनुभवही आहे.

यावर्षी ४९ विद्यार्थ्यांना वहया, २७ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क , १ विद्यार्थ्याला एस.टी.पास व एस.एस.सी.परीक्षेला बसणाया ०४ विद्यार्थ्यांना बोर्डाचे परीक्षा शुल्क मिळून सुमारे १५-२० हजार रुपये या योजनेमार्फत खर्च करण्यांत आले. आजी व माजी विद्यार्थी व शिक्षक स्वतःच्या वाढदिवसानिमित्त देणगी देतात त्यातून ही मदत दिली जाते हे कौतुकास्पद आहे.या योजनेचे प्रमुख म्हणून श्री.देवळेकर सर काम पाहतात. मा. मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षकांचे मार्गदर्शन मिळते.


**पालक शिक्षक संघ**

पालक शिक्षक संघाचे कामही अतिशय सक्रिय असून सर्व पालकांची सर्वसाधारण सभा,वर्गवार पालक सभा व कार्यकारिणीची सभा आयोजित करण्यांत आल्या.सर्वप्रकारच्या सभांना उत्स्फूर्त उपस्थिती ठेवून आणि सविस्तर मनमोकळी चर्चा करुन विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अनेक चांगले निर्णय घेण्यास पालकांनी सहकार्य केले. त्यातूनच शाळेसाठी LCD प्रोजेक्टर,जनरेटर,फायबर खुर्च्यांची खरेदी करण्याचा एकमताने निर्णय घेण्यांत आला.शाळेच्या तत्कालीन सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे व खेळाडूंना ट्रॅकसूट,प्रवास भाडे किंवा खेळाचे साहित्य खरेदी करणे यासारख्या गोष्टीही पालकांच्या सहकार्यामुळेच पूर्ण करता आल्या. यासर्वच पालक शिक्षक बांधवांचे मनःपूर्वक आभार ! या विभागाचे अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.कांबळे सर व सचिव म्हणून श्री.सी.एस.पाटील सर काम पाहतात.

**विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारा शिक्षकवृंद**

१. **मा. एस.एम.कांबळे - मुख्याध्यापक**
   रत्नागिरी तालुका मुख्याध्यापक संघ,उपाध्यक्षपदी निवड.
   रत्नागिरी तालुका(माध्य.शाळा) मुख्याध्यापक परीक्षा विभाग,प्रमुखपदी निवड
२. **श्री. बी.डी.पोवार - उपमुख्याध्यापक**
   रत्नागिरी तालुका माध्य.अध्यापक संघ,सल्लागार पदी निवड
३. **श्री. सी.एस.पाटील - पर्यवेक्षक**
   रत्नागिरी तालुका माध्य.अध्यापक संघ अध्यक्षपदी निवड
४. **श्री. आर. पी.रहाटे**
   जिल्हा गणित अध्यापक मंडळावर सचिवपदी निवड.
५. **श्री. एन.टी. देवळेकर सर**
   राज्यशासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार राज्यपाल के.शंकर नारायणन यांच्याहस्ते प्राप्त व मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे हस्ते ५ सप्टेंबर २०१२ रोजी नाशिक येथे सन्मान
   माध्यमिक अध्यापक वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षणास तज्ज्ञ मार्गदर्शक ( १ जून ते १० जून २०१२ )
६. **श्री. आर.व्ही.गद्रे**
   जनजागृती फॉऊडेंशन कार्यक्षेत्र-महाराष्ट्र राज्य अंतर्गत - कार्याध्यक्ष

या शाळेत मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक मिळून **४०** शिक्षक व **१२** शिक्षकेतर कर्मचारी आहेत. या शाळेची विद्यार्थी संख्या **१५३२** एवढी आहे.



तेजस्विनावधीतमस्तु

# रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची
# रा. भा. शिर्के प्रशाला , रत्नागिरी

# वार्षिक अहवाल

## सन २०१२-१३